जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 APR 2017
महाराष्ट्र टाईम्स




शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्यावतीने स्वीकारताना चेअरमन डॉ. अनिल पाटील आणि माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत.

# 'रयत ही कर्मवीरांची प्रयोगशाळा'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते, तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली', असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेस गुरूवारी सकाळी प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्यावतीने पुरस्कार स्वीकारला. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी त्यांना पुरस्कार प्रदान केला. रोख १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, 'कर्मवीरांनी केलेल्या प्रयोगांमुळे समाजातल्या तळागाळातल्या, गोरगरीब, दलित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे शक्य झाले. रा. कृ. कणबरकर यांना त्यांनी असेच बेळगावहून साताऱ्याला शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून आणले. त्यांना कराडच्या संत गाडगे महाराज महाविद्यालयाचा प्राचार्यही केले.'

प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, 'महाराष्ट्राचे व्यापक कार्यक्षेत्र कणबरकरांना लाभले आणि आपली लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून त्यांनी नवी महाविद्यालये आणि विद्यार्थी घडविले. कणबरकर हे अत्यंत नेकदार व सर्जनशील वृत्तीचे व्यक्ती होते. शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा दुवा होता.'

रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, 'आजवर रयत शिक्षण संस्थेला अनेक पुरस्कार मिळाले, पण, शिवाजी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. या भूमीचा हा पुरस्कार आम्ही कर्मवीरांचा गौरव मानतो.'

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यात येत असलेला हा पुरस्कार म्हणजे कर्मवीर अण्णांच्या संस्कारांचा सत्कार आहे. वंचित, शोषित समाजघटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कर्मवीरांचे कार्य हे भारतरत्नाच्या तोडीचे आहे. त्या दृष्टीने कर्मवीर नवसमाजाचे रचनाकार होते.'

प्राचार्य कणबरकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी चित्रफीत दाखविण्यात आली. प्राचार्य बी. ए. खोत यांनी स्वागत केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी कुटुंबियांतर्फे मान्यवरांचा सत्कार केला. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एन. जे. पवार, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, श्रीमती शालिनी कणबरकर, पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. भालबा विभुते आदी उपस्थित होते.

14 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल'अंतर्गत गुरुवारी समाजरत्न भीमक्रांती पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी डावीकडून पाटबंधारे निवृत्त अधीक्षक राजन कदम, गणी आजरेकर, प्रा. आनंद भोजणे, बबनराव रानगे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवाजीराव वर्धन, नामदेवराव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, अध्यक्ष सदानंद डिगे.

# समाजरत्न पुरस्कारांचे वितरण

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

लोकशाही मूल्यांच्या सबलीकरणासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे प्रत्येकाने आचरण केले पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल' अंतर्गत समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने डॉ. शिंदे यांना गौरविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे कार्यक्रम झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, 'स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि सहकार्य या तत्त्वांवर आधारित आदर्श समाजव्यवस्था उभी राहण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्यघटना लिहिली. भारतीय संविधान सर्व खासगी, सार्वजनिक क्षेत्रांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे आहे. संविधानापूर्वी आपल्याकडे 'राजा' व 'जात' अशीच व्यवस्था होती. मात्र संविधान निर्मितीनंतर हीच व्यवस्था माणूस म्हणून ओळख लागली. डॉ. आंबेडकर केवळ एकाच जातीचे, समाजाचे नव्हते. महापुरूषांना जात आणि धर्माच्या राजकारणात अडविले जात आहे. अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचे काम मोठे आहे. त्यांच्या विचारांची आजही देशाला गरज आहे.'

यावेळी पाटबंधारे निवृत्त अधीक्षक राजन कदम यांच्याहस्ते मल्हार सेनेचे राज्याध्यक्ष बबनराव रानगे, कोल्हापूर अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष नामदेवराव कांबळे, सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मुस्लिम बोर्डिंगचे चेअरमन गणी आजरेकर, अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक, फाउंडेशनचे उपाध्यक्ष भरत कुडित्रेकर, धोंडिराम कांबळे, महादेव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, सी. जी. गायकवाड आदी उपस्थित होते. एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनचे माजी अध्यक्ष सदानंद डिगे यांनी स्वागत केले. संचालक डी. के. कांबळे यांनी आभार मानले.

14 APR 2017

जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्यावतीने स्वीकारताना चेअरमन डॉ. अनिल पाटील आणि माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत.

# 'रयत ही कर्मवीरांची प्रयोगशाळा'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते, तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली', असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेस गुरूवारी सकाळी प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्यावतीने पुरस्कार स्वीकारला. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी त्यांना पुरस्कार प्रदान केला. रोख १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, 'कर्मवीरांनी केलेल्या प्रयोगांमुळे समाजातल्या तळागाळातल्या, गोरगरीब, दलित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे शक्य झाले. रा. कृ. कणबरकर यांना त्यांनी असेच बेळगावहून साताऱ्याला शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून आणले. त्यांना कराडच्या संत गाडगे महाराज महाविद्यालयाचा प्राचार्यही केले.'

प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, 'महाराष्ट्राचे व्यापक कार्यक्षेत्र कणबरकरांना लाभले आणि आपली लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून त्यांनी नवी महाविद्यालये आणि विद्यार्थी घडविले. कणबरकर हे अत्यंत नेकदार व सर्जनशील वृत्तीचे व्यक्ती होते. शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा दुवा होता.'

रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, 'आजवर रयत शिक्षण संस्थेला अनेक पुरस्कार मिळाले, पण, शिवाजी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. या भूमीचा हा पुरस्कार आम्ही कर्मवीरांचा गौरव मानतो.'

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यात येत असलेला हा पुरस्कार म्हणजे कर्मवीर अण्णांच्या संस्कारांचा सत्कार आहे. वंचित, शोषित समाजघटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कर्मवीरांचे कार्य हे भारतरत्नाच्या तोडीचे आहे. त्या दृष्टीने कर्मवीर नवसमाजाचे रचनाकार होते.'

प्राचार्य कणबरकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी चित्रफीत दाखविण्यात आली. प्राचार्य बी. ए. खोत यांनी स्वागत केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी कुटुंबियांतर्फे मान्यवरांचा सत्कार केला. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एन. जे. पवार, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, श्रीमती शालिनी कणबरकर, पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. भालबा विभुते आदी उपस्थित होते.

14 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘रयत’ ही कर्मवीरांची शैक्षणिक प्रयोगशाळा

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील; रयत शिक्षण संस्थेस विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते. तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली असल्याचे गौरवोद्‌गार ज्येष्ठ विचारवंत व रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील यांनी गुरुवारी येथे काढले. शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी त्यांना पुरस्कार प्रदान केला. रोख १ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. पाटील म्हणाले, कर्मवीरांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रयोग केले. या प्रयोगांमुळे समाजातल्या तळागाळातल्या, गोरगरीब, दलित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे शक्य झाले. खेड्यापाड्यातल्या मातीतली रत्नं त्यांनी शिक्षणाच्या माध्यमतून गोळा केली आणि या बळावर समतेची रचना केली. रा. कृ. कणबरकर सरांनाही त्यांनी बेळगावहून साताऱ्याला शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून आणले. त्यांना कराडच्या संत गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्यही केले. अण्णांचा कणबरकर सरांना साताऱ्याला आणण्याचा निर्णय सरांच्या कारकिर्दीवर दूरगामी परिणाम करणारा ठरला. महाराष्ट्राचे व्यापक कार्यक्षेत्र कणबरकरांना लाभले आणि आपली लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून त्यांनी नवी महाविद्यालये आणि विद्यार्थी घडविले.




कोल्हापूर : विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्या वतीने स्वीकारताना चेअरमन डॉ. अनिल पाटील व माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत आदी. (छाया : पप्पू अत्तार)

कणबरकर सर अत्यंत नेक, सरळमार्गी व सर्जनशील वृत्तीचे व्यक्ती होते. राजर्षी शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, आजवर रयत शिक्षण संस्थेला अनेक पुरस्कार मिळाले; पण शिवाजी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. कारण या भूमीने आम्हाला कर्मवीर दिले. सन १९०२-०८ या कालावधीत अण्णा कोल्हापुरात जैन बोर्डिंगमध्ये शिकण्यासाठी राहिले होते. तर अखेरचे वर्ष त्यांना राजर्षी शाहू महाराजांसमवेत राजवाड्यातच व्यतीत करण्याची संधी लाभली. महात्मा फुले, शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांना त्यांनी गुरू मानले. आणि त्यांच्या विचारांना कृतीचे स्वरूप देण्यात अण्णा यशस्वी झाले. राजर्षी शाहू महाराजांचे सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्र वसतिगृह काढण्याचे स्वप्न कर्मवीरांना पुढे पूर्ण केले. म्हणून या भूमीचा हा पुरस्कार

जागतिकीकरणाच्या रेट्यात शिक्षण बदलल्याचे सांगून डॉ. अनिल पाटील म्हणाले, या बदलत्या परिस्थितीमध्ये रयत शिक्षण संस्था आपल्या ध्येयापासून तसूभरही न ढळता आपले शैक्षणिक कार्य करीत आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्य विकास, रोजगाराभिमुखता या गोष्टींना या नव-व्यवस्थेत मोठे महत्त्व आले आहे. त्या दृष्टीने शिक्षणक्रमात कालसुसंगत बदल करून विद्यार्थी घडविण्याला रयतचे प्राधान्य आहे. त्याचवेळी विना-अनुदानसारखी कितीही संकटे आली तरी, आदिवासी, ग्रामीण पाड्यांपर्यंत शिक्षणाची गंगा नेण्याचे व्रत संस्था कधीही सोडणार नाही, याची ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली. शिक्षणाच्या क्षेत्रात मिळकतीनुसार, कॉन्व्हेंट, इंग्लिश मीडियम, मराठी व सेमी-इंग्लिश माध्यम आणि जिल्हा परिषद शाळा अशी नवी चातुर्वर्ण्य व्यवस्था उदयास येते आहे. शिक्षणाचे पावित्र्य टिकविण्यासाठी ही लढाई लढून जिंकण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यात येत असलेला हा पुरस्कार म्हणजे कर्मवीर अण्णांच्या संस्कारांचा सत्कार आहे. कर्मवीरांनी शिक्षण आणि श्रमसंस्काराचे मूल्य समाजमनात खोलवर रूजविले. श्रमसंस्कारातून गरीब, मागास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केलेला आत्मविश्वास अत्यंत महत्त्वाचा आहे. कित्येत वंचित, शोषित समाजघटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कर्मवीरांचे कार्य हे भारतरत्नाच्या तोडीचे आहे. त्या दृष्टीने कर्मवीर भारतीय नवसमाजाचे रचनाकार होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य कणबरकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य बी.ए. खोत यांनी केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी कणबरकर कुटुंबीयांतर्फे मान्यवरांचा सत्कार केला. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमास विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एन.जे. पवार, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एम. चव्हाण, डॉ. बी.पी. साबळे, श्रीमती शालिनी कणबरकर, पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भालबा विभुते यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, महाविद्यालयांचे प्राचार्य, रयत शिक्षण संस्थेशी संबंधित शाळा, महाविद्यालयांचे शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 APR 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्या वतीने स्वीकारताना चेअरमन डॉ. अनिल पाटील व माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. बी. ए. खोत. (वृत्त पान २ वर)

14 APR 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रयत' कर्मवीरांची प्रयोगशाळा

## एन. डी. : प्राचार्य कणबरकर पुरस्कार रयत संस्थेस प्रदान

कोल्हापूर, ता. १३ : कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते; तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नेते व विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी आज येथे काढले. शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेस प्रदान झाला.

या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेतर्फे पुरस्कार स्वीकारला. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी त्यांना पुरस्कार प्रदान केला. १ लाख ५१ हजार रुपये रोखे, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. पाटील म्हणाले, ''कर्मवीरांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रयोग केले. या प्रयोगांमुळे समाजातल्या तळागाळातल्या, गोरगरीब, दलित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे शक्य झाले. खेड्यापाड्यांतल्या मातीतली रत्ने त्यांनी गोळा केली आणि त्यांच्या माध्यमातून समतेची रचना केली. रा. कृ. कणबरकर यांना अण्णांनी बेळगावहून साताऱ्याला शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून आणले. त्यांना कऱ्हाडच्या संत गाडगे महाराज महाविद्यालयाचा प्राचार्यही केले. अण्णांचा कणबरकरांना साताऱ्याला आणण्याचा निर्णय त्यांच्या कारकिर्दीवर दूरगामी परिणाम करणारा ठरला. महाराष्ट्राचे व्यापक कार्यक्षेत्र कणबरकरांना लाभले आणि आपली लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून त्यांनी नवी महाविद्यालये आणि विद्यार्थी घडविले. कणबरकर नेकदार, सरळमार्गी व सर्जनशील वृत्तीचे होते. राजर्षी शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता.''



कोल्हापूर : 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते गुरुवारी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने स्वीकारताना अध्यक्ष डॉ. अनिल पाटील व माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. बी.ए. खोत.

> रयत शिक्षण संस्थेस प्रदान होत असलेला हा पुरस्कार म्हणजे कर्मवीर अण्णांच्या संस्कारांचा सत्कार आहे. कर्मवीरांनी शिक्षण आणि श्रमसंस्काराचे मूल्य समाजमनात रुजविले. श्रमसंस्कारातून गरीब, मागास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केलेला आत्मविश्वास महत्त्वाचा आहे. कित्येक वंचित, शोषित समाजघटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कर्मवीरांचे कार्य हे 'भारतरत्न'च्या तोडीचे आहे. त्या दृष्टीने कर्मवीर भारतीय नवसमाजाचे रचनाकार होते.
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

14 APR 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



नसीर अत्तार

शिवाजी विद्यापीठाचा 'प्राचार्य आर. के. कणबरकर' पुरस्कार गुरुवारी साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आला. 'रयत'चे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. एन. डी. पाटील व विद्यमान अध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी तो कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारला. यावेळी डावीकडून प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य बी. एन. खोत उपस्थित होते.

## एन. डी. पाटील : 'प्राचार्य कणबरकर' पुरस्काराने 'रयत'चा सन्मान

# कर्मवीरांच्या शैक्षणिक यज्ञात कणबरकर यांचे योगदान

कोल्हापूर : खेड्यापाड्यांतील अनेक रत्ने, सुगंधित फुलांना गोळा करून कर्मवीर अण्णांनी 'रयत'ची उभारणी केली. यामध्ये नेकदार आणि सरळ स्वभावाचे माजी कुलगुरु डॉ. रा. कृ. कणबरकर यांचा समावेश होता. अण्णा हे त्यांचे शैक्षणिक कार्याबाबतचे दिशादर्शक होते आणि अण्णांच्या शैक्षणिक यज्ञात कणबरकर यांचेही मोठे योगदान राहिले, असे गौरवोद्गार 'रयत'चे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी गुरुवारी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठातर्फे रयत शिक्षण संस्थेला 'प्राचार्य आर. के. कणबरकर' राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रा. पाटील व 'रयत'चे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. एक लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे.

प्रा. पाटील म्हणाले, 'कर्मवीर अण्णांनी कोणताही ग्रंथ न वाचता शैक्षणिक क्षेत्रात नवे प्रयोग घडवीत महाराष्ट्राचा चेहरा बदलला. शिक्षणतज्ज्ञांचे ते महर्षी होते. अण्णांनी बेळगावमधून डॉ. कणबरकर यांना 'रयत'मध्ये आणले. 'रयत'मध्ये येण्याचा कणबरकर यांचा निर्णय त्यांच्या कार्याला व्यापक दिशा देणारा ठरला. अण्णांच्या विचारांनुसार 'रयत'ची वाटचाल सुरू आहे. आज विद्यापीठाने डॉ. कणबरकर पुरस्काराने केलेला सन्मान हा अनेक पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ आहे, असे डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. डॉ. अरुण कणबरकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, बी. पी. साबळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, आदींसह शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य बी. ए. खोत यांनी स्वागत केले. प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मानपत्र वाचन केले. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

## नवविचारांना सामोरा जाणारा योद्धा

डॉ. कणबरकर यांच्यासमवेत विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीमध्ये काम करण्याचे मला भाग्य लाभले होते. त्यांनी मला वडीलबंधूप्रमाणे प्रेम दिल्याचे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, कणबरकर हे सरळमार्गी, तर मी चळवळी होतो; पण त्यांच्या आणि माझ्यातील साम्याचा एक घटक 'राजर्षी शाहू महाराजांचा आदर्श' हा होता. कणबरकर हे नव्या विचाराला त्याच दमाने सामोरे जाणारे योद्धे होते. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन प्रयोग केले. त्यांच्या नावाने पुरस्कार सुरु करण्याचा विद्यापीठ व कणबरकर कुटुंबीयांचा उपक्रम विधायक आहे.

## 'रयत'चे वेगळे विद्यापीठ

सध्या ज्ञानाला विज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. ते लक्षात घेऊन शेती, तंत्रज्ञान, आरोग्य, कौशल्य विकास असे विविध क्षेत्रांत नवनवीन उपक्रम, अभ्यासक्रमांद्वारे 'रयत'ची एक वेगळे विद्यापीठ स्थापनेच्या दिशेने वाटचाल सुरु असल्याचे अध्यक्ष डॉ. पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, शासन आज शिक्षणावर फारसा खर्च करीत नाही, मग 'प्रगत महाराष्ट्र' कसा होणार? पैसे असणाऱ्यांनाच चांगले शिक्षण मिळत असल्याचे वास्तव आहे. अशा स्थितीत भविष्यात शिक्षणासाठी चौथी लढाई होणार आहे. सर्वसामान्यांसाठी 'रयत' ही लढाई लढणार आहे. यासाठी हा पुरस्कार आम्हाला प्रेरकशक्ती ठरणार आहे.

14 APR 2017 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी : एन. डी. पाटील

## रयत शिक्षण संस्थेस कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते, तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ विचारवंत व रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एन. डी. पाटील यांनी गुरुवारी येथे काढले. ते शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेस गुरुवारी कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोहळ्याला प्रमुख उपस्थिती प्रा. एन. डी. पाटील यांची होती. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभात डॉ. अनिल पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. रोख १,५१,००० रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य बी. ए. खोत यांनी केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मानपत्राचे वाचन केले.

एन. डी. पाटील म्हणाले, कर्मवीरांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रयोग केले. त्यांच्यामुळे गोरगरिबांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होता आले. त्याचप्रमाणे रा. कृ. कणबरकरांनीही लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून विद्यार्थी घडवले. कणबरकर सर अत्यंत नेकदार, सरळमार्गी व सर्जनशील वृत्तीचे होते. राजर्षी शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता.

यावेळी रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, आजवर रयत शिक्षण संस्थेला अनेक पुरस्कार मिळाले; पण शिवाजी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे; कारण या भूमीने आम्हाला कर्मवीर दिला. सन १९०२-०८ या कालावधीत अण्णा कोल्हापुरात जैन बोर्डिंगमध्ये शिकण्यासाठी राहिले होते, तर अखेरचे वर्ष त्यांना राजर्षी शाहू महाराजांसमवेत राजवाड्यातच व्यतित करण्याची संधी लाभली. राजर्षी शाहू महाराजांचे सर्व जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्र वसतिगृह काढण्याचे स्वप्न कर्मवीरांनी पुढे पूर्ण केले. म्हणून या भूमीचा हा पुरस्कार महत्त्वाचा आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, रयत शिक्षण संस्थेस प्रदान करण्यांत येत असलेला हा पुरस्कार म्हणजे कर्मवीरअण्णांच्या संस्कारांचा सत्कार आहे. कर्मवीरांनी शिक्षण आणि श्रमसंस्काराचे मूल्य समाजमनात खोलवर रुजविले.

दरम्यान, प्राचार्य कणबरकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. तसेच डॉ. अरुण कणबरकर यांनी कणबरकर कुटुंबीयांतर्फे मान्यवरांचा सत्कार केला. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.यावेळी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एन. जे. पवार, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, शालिनी कणबरकर, पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भालबा विभूते आदी मान्यवर उपस्थित होते.

14 APR 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Rayat Shikshan Sanstha conferred with Kanbarkar award

TOI




(From left ) Former chairman of Rayat Shikshan Sanstha N D Patil , V-C Shinde, registrar Vilas Nadavadekar and and principal B A Khot

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The vice-chancellor of the Shivaji University, Kolhapur (SUK), Devanand Shinde, on Thursday conferred the 'Principal R K Kanbarkar Award' on educational foundation Rayat Shikshan Sanstha, on Thursday.

N D Patil, former chairman of the Satara-based Rayat Shikshan Sanstha, was the chief guest for the event. The event saw presence of the present chairman of the organisation Anil Patil, along with other university officials.

During his speech, N D Patil said, "The real pioneer of our foundation, Karmveer Bhaurao Patil, helped in developing a modern education system. Back in 1919, Bhaurao Patil made sure that students from all the sections of the society, including the poor and the dalits, must get a chance to study."

"R K Kanbarkar who had also served as the principal of Sant Gadge Maharaj College was a straight forward, helpful and kind man," he said.

Anil Patil, said, " The organisation has bagged numerous awards till date. However, getting an award from SUK is a distinguished achievement for us."

"The organisation is committed to give and develop better students across classes and sections in our society. We not only cover the urban areas, but are also committed to introduce education in the rural and remote areas of the state," he said.

**R K Kanbarkar award is conferred every year on April 13, which is celebrated as the birth anniversary of R K Kanbarkar. The organisation was felicitated with a cash prize of Rs 1.51 lakh, a memento and a shawl**

Shinde said, "The felicitation of the Rayat Shikshan Sanstha is because of their endless dedication in the field of education. They have made immense contribution in bringing students into the mainstream education."

R K Kanbarkar award is conferred every year on April 13, the birth anniversary of R K Kanbarkar. The organisation was felicitated with a cash prize of Rs 1.51 lakh, memento and a shawl.

Kanbarkar has served as the vice chancellor of SUK from 1980 to 1983. He was also a social activist and leader of several progressive movements across the state. He had also served as an executive member of several social and educational organizations in the city.

14 APR 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाचे पालन केल्यास जगणे समृद्ध

## डॉ. देवानंद शिंदे : डिगे फौंडशनतर्फे 'समाजरत्न भीम क्रांती' पुरस्काराचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर , ता. १४ : "भारतीय संविधान जगण्याची शैली आहे. म्हणून संविधानाचे पालन केल्यास जगणे समृद्ध होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान रूपाने दिलेली शिकवण मोलाची आहे. त्यांच्याच विचाराने पुढे जाणाऱ्या संस्थेकडून मिळणारा समाजरत्न भीम क्रांती पुरस्कार मौलिक आहे." असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

येथील एस. के. डिगे मेमोरियल फौंडशनतर्फे आज 'समाजरत्न भीम क्रांती' पुरस्काराचे वितरण झाले, या वेळी ते बोलत होते.

श्री. शिंदे यांच्यासह अर्बन बँकेचे अध्यक्ष नामदेवराव कांबळे, सुवर्णपदक विजेते आनंद भोजणे, मल्हार सेनेचे अध्यक्ष बबन रानगे, माजी कृषी अधिकारी शिवाजी वर्धन यांना पुरस्कार दिला. शाल, स्मृती, चिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, "संविधानाने प्रत्येक व्यक्तीला भारतीय अशी ओळख दिली आहे. प्रत्येक व्यक्तीमधील 'मी पणा' काढून 'आम्ही'ची जाणीव करून दिली आहे. त्यातून आपल्यातील भेदाच्या भिंती पाडून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे बळ संविधानातून मिळते. संविधान सकारात्मक ऊर्जा देते. संविधान केवळ पूजन करून चालणार नाही, तर त्याचे पालनही केले पाहिजे. त्यांच्या विचाराच्या प्रभावामुळे मी पोलिसांचा मुलगा असूनही एका विद्यापीठाचा कुलगुरू झालो आहे.

फौंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल' घेण्यात येतो. यंदाही विविध सामाजिक उपक्रम राबविले. यात कर्तृत्ववान व्यक्तींच्या मुलाखती तसेच विविध प्रबोधनाचे कार्यक्रम झाले."

या वेळी प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, पी. बी. गायकवाड उपस्थित होते. फौडेंशनचे अध्यक्ष एस. के. डिगे यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र कोरे यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : एस. के. डिगे मेमोरियल फौंडेशनतर्फे समाजरत्न भीम क्रांती पुरस्काराचे वितरण गुरुवारी झाले. या वेळी गणी आजरेकर, अजय भोजणे, बबन रानगे, डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी वर्धन, नामदेवराव कांबळे, एस. के. डिगे आदी.

(नितीन जाधवः सकाळ छायाचित्रसेवा)

1 4 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल'अंतर्गत गुरुवारी समाजरत्न भीमक्रांती पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी डावीकडून पाटबंधारे निवृत्त अधीक्षक राजन कदम, गणी आजरेकर, प्रा. आनंद भोजणे, बबनराव रानगे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शिवाजीराव वर्धन, नामदेवराव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, अध्यक्ष सदानंद डिगे.

# समाजरत्न पुरस्कारांचे वितरण

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

लोकशाही मूल्यांच्या सबलीकरणासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे प्रत्येकाने आचरण केले पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल' अंतर्गत समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने डॉ. शिंदे यांना गौरविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे कार्यक्रम झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, 'स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि सहकार्य या तत्त्वांवर आधारित आदर्श समाजव्यवस्था उभी राहण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्यघटना लिहिली. भारतीय संविधान सर्व खासगी, सार्वजनिक क्षेत्रांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे आहे. संविधानापूर्वी आपल्याकडे 'राजा' व 'जात' अशीच व्यवस्था होती. मात्र संविधान निर्मितीनंतर हीच व्यवस्था माणूस म्हणून ओळख लागली. डॉ. आंबेडकर केवळ एकाच जातीचे, समाजाचे नव्हते. महापुरूषांना जात आणि धर्माच्या राजकारणात अडविले जात आहे. अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचे काम मोठे आहे. त्यांच्या विचारांची आजही देशाला गरज आहे.'

यावेळी पाटबंधारे निवृत्त अधीक्षक राजन कदम यांच्याहस्ते मल्हार सेनेचे राज्याध्यक्ष बबनराव रानगे, कोल्हापूर अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष नामदेवराव कांबळे, सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मुस्लिम बोर्डिंगचे चेअरमन गणी आजरेकर, अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक, फाउंडेशनचे उपाध्यक्ष भरत कुडित्रेकर, धोंडिराम कांबळे, महादेव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, सी. जी. गायकवाड आदी उपस्थित होते. एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनचे माजी अध्यक्ष सदानंद डिगे यांनी स्वागत केले. संचालक डी. के. कांबळे यांनी आभार मानले.

14 APR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे : समाजरत्न भीमक्रांती पुरस्कारांचे वितरण; डिगे फाउंडेशनतर्फे आयोजन**

# लोकशाही सबलीकरणासाठी आंबेडकरांच्या विचारांची गरज



एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे भीम फेस्टिव्हलअंतर्गत गुरुवारी समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून राजन कदम, गणी आजरेकर, आनंद भोजणे, बबन रानगे, देवानंद शिंदे, शिवाजीराव वर्धन, नामदेव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, सदानंद डिगे, सी. जी. गायकवाड उपस्थित होते.

**कोल्हापूर :** स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि सहकार्य या तत्त्वांवर आधारित आदर्श समाजव्यवस्था उभी राहावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी राज्यघटना लिहिली. लोकशाही मूल्यांच्या सबलीकरणासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची आजही गरज असून, प्रत्येकाने त्याचे आचरण केले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शाहू स्मारक भवन येथे एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे 'भीम फेस्टिव्हल' अंतर्गत गुरुवारी समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने डॉ. शिंदे यांना गौरविण्यात आले. यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. याप्रसंगी मुस्लिम बोर्डिंगचे चेअरमन गणी आजरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिंदे म्हणाले, भारतीय संविधान हे सर्व खासगी, सार्वजनिक क्षेत्रांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे आहे. संविधानापूर्वी आपल्याकडे 'राजा' व 'जात' अशीच व्यवस्था होती. मात्र, संविधान निर्मितीनंतर हीच व्यवस्था माणूस म्हणून ओळखू लागली.

याप्रसंगी मल्हार सेनेचे राज्याध्यक्ष बबनराव रानगे, कोल्हापूर अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष नामदेवराव कांबळे, सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, माजी कृषी अधिकारी शिवाजीराव वर्धन यांना पाटबंधारे निवृत्त अधीक्षक राजन कदम यांच्या हस्ते समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनचे माजी अध्यक्ष सदानंद डिगे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक डी. के. कांबळे यांनी आभार मानले. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक, फाउंडेशनचे उपाध्यक्ष भरत कुडित्रेकर, धोंडिराम कांबळे, महादेव कांबळे, प्रभाकर कांबळे, सतीश कुरणे, सी. जी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
14 APR 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य अंमलबजावणीवरच कायद्याचे यश अवलंबून

कोल्हापूर : नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा कालसुसंगत आहे. त्याच्या योग्य अंमलबजावणीवरच त्याची यशस्विता अवलंबून राहील, असे प्रतिपादन जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आर. एस. माळी यांनी बुधवारी येथे व्यक्त केले.

'नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६'बाबत सर्व संबंधित घटकांना सविस्तर माहिती करुन देण्याच्या उद्देशाने विद्यापीठातर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यशाळेत त्यांचे बीजभाषण झाले. डॉ. माळी म्हणाले, शिक्षणाच्या दर्जावृद्धीवर नूतन कायद्यात भर दिला आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, शिक्षणपूरक कृतिसत्रे, आधुनिक माहिती-तंत्रज्ञानाचा अंगीकार ही या कायद्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. शिक्षणतज्ज्ञ डॉ. आनंद मापुस्कर यांनीही विचार मांडले. कार्यशाळेच्या प्रारंभी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, कार्यशाळेतील दुपारच्या सत्रात शिक्षणतज्ज्ञ प्रा. सुधाकर मानकर यांनी 'कायद्यातील शैक्षणिक तरतुदी' या विषयावर, तर शंकरराव कुलकर्णी यांनी कायद्यातील 'विद्यार्थीविषयक तरतुदींबाबत मार्गदर्शन केले.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी झालेल्या नवीन 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६' बाबतच्या कार्यशाळेत माजी कुलगुरु डॉ. एस. आर. माळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून शंकरराव कुलकर्णी, सुधाकर मानकर, डॉ. डी. टी. शिर्के, आदी उपस्थित होते.

## गट-तट विसरावेत

शिक्षण मंडळांपासून ते विद्यापरिषदेपर्यंत सर्व अधिकार मंडळांवर प्राध्यापक असतात. आपापसांतील गट-तट विसरुन त्यांनी हा कायदा राबविण्यासंदर्भात एकत्र यावे असे डॉ. मापुस्कर यांनी सांगितले.

## शिवाजी विद्यापीठ 'पहिले'

नूतन कायद्याविषयी पहिले चर्चासत्र भरविणारे, हंगामी अधिकार मंडळांची स्थापना करणारे शिवाजी विद्यापीठ राज्यातील पहिले आणि एकमेव विद्यापीठ असल्याचे सहसचिव खरात यांनी सांगितले.

14 APR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य अंमलबजावणीवर नवीन विद्यापीठ कायद्याचे यश

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा कालसुसंगत असून त्याच्या योग्य अंमलबजावणीवरच त्याची यशस्विता अवलंबून राहील, असे प्रतिपादन जळगावमधील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. आर. माळी यांनी केले.

एक मार्चपासून अंमलात आलेल्या नवीन 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'च्या संदर्भात शिवाजी विद्यापीठातर्फे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेत बीजभाषण करताना ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात पार पडलेल्या कार्यशाळेत अधिकारी, कर्मचारी, लिपिक आदींनी सहभाग नोंदवला.

डॉ. माळी म्हणाले, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन, शिक्षणपूरक कृतिसत्रे, आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा अंगिकार ही या कायद्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. दर्जावृद्धीसाठी नवसंशोधन व नवनिर्मितीस प्रोत्साहन, परीक्षा व मूल्यमापन पद्धतीत सुधारणा, आंतरविद्याशाखीय सहसंबंधात वृद्धी, इन्क्युबेशन, औद्योगिक साहचर्य तसेच कौशल्य विकास अभ्यासक्रमांना प्रोत्साहन आदी बाबी या कायद्यात आहेत. याची अंमलबजावणी विद्यापीठांनी करणे गरजेचे आहे. ज्या देशात शिक्षणाचा दर्जा खालावतो, ते राष्ट्र रसातळाला जाते, असा इशाराही त्यांनी याप्रसंगी दिला.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात म्हणाले, प्रगतीचा मार्ग हा उच्चशिक्षणातूनच जातो, हे लक्षात घेऊन नवीन कायद्यात पूर्वीच्या १९९४च्या कायद्यापेक्षा साधारणतः ४० टक्के बदल करण्यात आला आहे. विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर कालसुसंगत तरतुदी केल्या आहेत. विद्यापीठांना परदेशात जाता येईल, क्लस्टर विद्यापीठे



कोल्हापूर : 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा' विषयक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. एस. आर. माळी.

स्थापन करता येतील, विद्यापीठांमधील आर्थिक अनियमितता टाळण्यासाठी त्यांचे इन्पेक्शन, ऑडिट करता येईल, निवडणुका, नामांकने यांचा योग्य मेळ साधत अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद यांची फेररचना, बोर्ड ऑफ डीनचा समावेश अशा अनेक तरतुदी केल्या आहेत. नूतन कायद्याविषयी पहिले चर्चासत्र भरविणारे तसेच नवीन कायद्यातील तरतुदींनुसार हंगामी अधिकार मंडळांची स्थापना करणारे शिवाजी विद्यापीठ राज्यातले पहिले विद्यापीठ असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षणतज्ज्ञ डॉ. आनंद मापुस्कर म्हणाले, हा कायदा विद्यार्थीकेंद्री असला तरी त्याची कार्यवाही शिक्षककेंद्री आहे. शिक्षकांती या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. विद्यापीठांनी स्वतःचा प्रगतचा रोडमॅप तयार करावा, असे आवाहनही त्यांनी केले. विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कार्यशाळेची उद्दिष्टे सांगितली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षणतज्ज्ञ प्रा. सुधाकर मानकर, शंकरराव कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले.